संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# जाहिरात

दि. ०२/०९/२०२१.

क्र.संगाबाअवि/१/रा.कु./४-४६५/२०२१,

**सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या अस्थायी सेवा एकत्रित मानधनावर घेण्यास्तव अर्ज मागविण्यात येत आहेत.**

विद्यापीठातील प्रशासकीय व शैक्षणिक विभागातील वर्ग-३ व ४ (तांत्रिक/अतांत्रिक) च्या विविध प्रकारच्या कामाकरिता मनुष्यबळाची आवश्यकता असल्याने कार्यालयीन कामाकरिता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवा मासिक एकत्रित मानधनावर उपलब्ध करून घेण्यास्तव पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत असून याबाबत सविस्तर माहिती, अर्जाचा नमूना, पात्रता व विनियम क्र.४/२०२० विद्यापीठ संकेतस्थळ www.sgbau.ac.in वर दि. ०४ /०९/२०२१ पासून डाउनलोड करण्यास उपलब्ध करून देण्यात येत आहे.

अर्ज करण्याची **अंतिम तारीख २३/०९/२०२१ सायं ६.०० वाजेपर्यंत** असून परिपूर्ण अर्ज विद्यापीठ संकेतस्तळावरून डाउनलोड करून टंकलिखित (संगणकीय) स्वरूपात आवश्यक शुल्क रु.१२०/- भरणा केल्याचे पावतीसह विद्यापीठ आवक शाखेत विहित दिनांक व वेळेत पोहोचतील अशा बेताने सादर करावेत.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

### सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या अस्थायी सेवा एकत्रित मानधनावर विद्यापीठातील वर्ग ३ व ४ संवर्गातील कामांसाठी घेण्यास्तव उमेदवारांची पात्रता -

१. अर्जदार महाराष्ट्र राज्यातील कृषी/अकृषी विद्यापीठे, राज्य शासनाच्या सेवेतून /निमशासकीय सेवेतून नियत वयोमानाप्रमाणे सेवानिवृत्त किंवा स्वेच्छानिवृत्त झालेला असावा.

२. वर्ग-३ व ४ च्या कामाकरिता सेवा उपलब्ध करून घेण्यात आलेली व्यक्ती तिची कामगिरी, चारित्र्य, वर्तणूक ई.च्या अधीन राहून वयाच्या ६५ वर्षापर्यंतच विद्यापीठ सेवेत कार्यरत राहू शकेल. ६५ वर्षावरिल सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी अर्ज करू नये.

३. सदर व्यक्ती कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने सक्षम असावी.
४. संगणकीय ज्ञान असणाऱ्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.

४. विद्यापीठ आस्थापनेत जे सेवानिवृत्त कर्मचारी वर्ग-३ व ४ संवर्ग कामासाठी कार्यरत असतील त्यांनासुद्धा वरीलप्रमाणे जाहिरातीनुसार अर्ज करून निवड प्रक्रियेच्या माध्यमातून यादीत समाविष्ट होणे आवश्यक राहील, अन्यथा त्यांच्या सेवा पुढे सुरू ठेवण्यात येणार नाही.

५. विद्यापीठ आस्थापनेव्यतिरिक्त इतर आस्थापनेतील आवेदनकर्त्याने सदर अर्जासोबत त्यांच्या नियोक्त्याचे, १) सेवानिवृत्तीचा दिनांक, २) सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पद, ३) सेवाकाळात पार पाडलेल्या कामाचे स्वरूप, ४) कुठलीही जबर शिक्षा ठोठावल्या नसल्याचे, ५) त्यांचेविरूद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसल्याचे तसेच ६) सेवेतील चारित्र्य व वर्तणूक चांगली असल्याचे प्रमाण सादर करावे.

६. अर्जासोबत रु.१२०/- शुल्क भरणा केल्याची प्रत जोडावी. शुल्क भरणा डिमांड ड्राफ्ट स्वरूपातसुद्धा स्विकारल्या जाईल.

७. अपूर्ण तसेच विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज स्विकारल्या जाणार नाहीत.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## विनियम क्र. ४/२०२०

## सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या अस्थायी सेवा एकत्रित मानधनावर विद्यापीठातील वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कामांसाठी घेण्याबाबतच्या कार्यवाहीचे विनियम - २०२०

ज्या अर्थी, दि.७.१२.२०१७ च्या व्यवस्थापन परिषदेने बाब क्र.२०८ अन्वये विद्यापीठ सेवेतून आणि राज्य शासकीय/निमशासकीय सेवेतून नियत वयोमानाने सेवानिवृत्त व स्वेच्छानिवृत्त वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांच्या अस्थायी सेवा एकत्रित मानधनावर घेण्यासंदर्भात समग्र विचार करून धोरण निश्चित करण्याचा निर्णय घेतला,

आणि

ज्या अर्थी, वरील प्रयोजनार्थ मा.कुलगुरुंद्वारा घटीत समितीच्या शिफारशी त्यासोबतच्या सहपत्रांसह दि.२८.११.२०२० च्या व्यवस्थापन परिषदेने बाब क्र.९६ अन्वये मान्य केल्यात,

त्या अर्थी, सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या अस्थायी सेवा एकत्रित मानधनावर विद्यापीठातील वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कामांसाठी घेण्याबाबतच्या कार्यवाहीसंदर्भात खालील प्रमाणे विनियम तयार करण्यात येत आहे.

१) या विनियमास 'सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या अस्थायी सेवा एकत्रित मानधनावर विद्यापीठातील वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कामांसाठी घेण्याबाबतच्या कार्यवाहीचे विनियम क्र. ४/२०२०' असे संबोधण्यात येईल.

२) हा विनियम व्यवस्थापन परिषदेने मंजूर केलेल्या दिनांकापासून म्हणजेच दि.२८.११.२०२० पासून अस्तित्वात येईल.

३) व्याख्या- या विनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

अ) "विद्यापीठ" म्हणजे अमरावती विद्यापीठ कायदा, १९८३ (महाराष्ट्र) XXXVII अन्वये स्थापन झालेले संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

ब) "सेवानिवृत्त कर्मचारी" म्हणजे महाराष्ट्र राज्यातील कृषी/अकृषी विद्यापीठे, राज्य शासनाच्या सेवेतून / निमशासकीय सेवेतून नियत वयोमानाने सेवानिवृत्त किंवा स्वेच्छानिवृत्त झालेले कर्मचारी.

क) "वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कामे" म्हणजे विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय व शैक्षणिक विभाग इ. मधील वर्ग ३ व वर्ग ४ अंतर्गत विविध संवर्गाशी संबंधित असलेली तांत्रिक/अतांत्रिक कामे.

४) विद्यापीठातील अल्प मनुष्यबळ, विविध विकासात्मक कामे तथा शैक्षणिक व प्रशासकीय विभागामधील वर्ग ३ व वर्ग ४ च्या विविध प्रकारच्या कामांकरिता मनुष्यबळाची आवश्यकता लक्षात घेता आवश्यकतेनुसार विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागांमधील वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कार्यालयीन कामांसाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवा मासिक एकत्रित मानधनावर उपलब्ध करून घेण्याकरिता पुढील प्रमाणे कार्यपद्धती विहित करण्यात येत आहे-

**अ) निवड प्रक्रिया-**

१) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचारी नियुक्त करण्यापूर्वी विद्यापीठास शासनाद्वारे मंजूर करण्यात आलेली वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील विविध पदे, सदर संवर्गातून रिक्त असलेली पदे तसेच याव्यतिरिक्त कामाचा वाढता व्याप लक्षात घेऊन उर्वरित किमान आवश्यक पदे याबाबतचा आढावा कार्यालयीन स्तरावर घेण्यात यावा. आवश्यकतेनुसार वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा प्राप्त करून घेण्याकरिता विविध प्रशासकीय व शैक्षणिक विभागांकडून आवश्यक सेवेच्या समर्थनासह सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या मागणीचे प्रस्ताव सोबतच्या **परिशिष्ट-अ** नुसार विहित प्रपत्रामध्ये प्राप्त करून घेण्यात यावेत. सदर प्रस्ताव तयार करतांना कामाचे स्वरूप, आवश्यकता, कामाचा कालावधी, आकस्मिकता, विद्यार्थी हित व सार्वजनिक हित, इ.बाबी विचारात घेण्यात याव्यात.

२) वर्ग ३ व वर्ग ४ मधील विविध प्रकारच्या कामांसाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्याकरिता पारदर्शक पद्धतीचा अवलंब करण्यात यावा. त्याकरिता विद्यापीठाद्वारे विविध कार्यालयीन कामांकरिता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची यादी तयार करण्याचे दृष्टीने आवश्यकतेनुसार स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन इच्छुक सेवानिवृत्त झालेल्या / पुढील सहा महिन्यांमध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून सोबतच्या **परिशिष्ट-ब** अन्वये विहित केलेल्या नमुन्यात अर्ज मागविण्यात यावेत.

३) विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय/शैक्षणिक विभागांकडून प्राप्त झालेली कर्मचाऱ्यांची मागणी व त्यांना आवश्यक असलेल्या सेवेचे स्वरूप लक्षात घेऊन प्राप्त अर्जाची छाननी या विनियमातील तरतुदी विचारात घेऊन आस्थापना शाखेचे स्तरावर करण्यात यावी व त्यासंदर्भातील विवरणपत्र तयार करून पात्र/अपात्रतेसंदर्भात कुलसचिवांकडून मान्यता प्राप्त करून घेण्यात यावी. पात्र व अपात्रतेसंदर्भातील अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार कुलसचिवांचा असेल.

४) विद्यापीठ आस्थापनेव्यतिरिक्त इतर आस्थापनामधील पात्र अर्जदारांना प्रत्यक्ष मुलाखतीकरिता आमंत्रित करावे. विद्यापीठ स्तरावर विविध कार्यालयीन कामांची आवश्यकता विचारात घेऊन विहित निवड समितीचे माध्यमातून वर्ग ३ व वर्ग ४ मधील सेवेकरिता सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची यादी तयार करण्यात यावी. सदर यादी तयार करतांना विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा प्राध्यान्याने विचार करावा. तसेच इतर सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांबाबतीत विद्यापीठास ज्या कामाकरिता कर्मचाऱ्याची आवश्यकता आहे, त्या कामाची जाण/क्षमता याबाबतची पडताळणी करून अशा व्यक्तींचा प्राध्यान्याने विचार करावा. सदर यादीमधूनच मागणीनुसार सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवा आस्थापना विभागामार्फत केंद्रीय पद्धतीने विविध विभागांना पुरविण्यात येतील.

५) सदर प्रयोजनार्थ निवड समिती खालील प्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १) | कुलसचिव | अध्यक्ष |
| २) | संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य |
| ३) | वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ४) | विद्यापीठ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमधून मा.कुलगुरू द्वारा नामित अधिसभा सदस्य | सदस्य |
| ५) | मा.कुलगुरूंद्वारा नामित एक प्रशासकीय अधिकारी | सदस्य |
| ६) | उपकुलसचिव(आस्था.) | सदस्य सचिव |

६) हा विनियम अस्तित्वात येण्यापूर्वी विद्यापीठ आस्थापनेत जे सेवानिवृत्त कर्मचारी वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गाची कामासाठी कार्यरत असतील, त्यांनासुद्धा वरीलप्रमाणे जाहिरातीनुसार अर्ज करून निवड प्रक्रियेच्या माध्यमातून यादीत समाविष्ट होणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांच्या सेवा पुढे सुरू ठेवण्यात येणार नाही.

**ब) बंधपत्र/हमीपत्र-**

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवा उपलब्ध करून घेतांना या संदर्भात या सोबतचे **परिशिष्ट-क** नुसार विहीत केलेले बंधपत्र/हमीपत्र संबंधितांकडून घेण्यात यावे.

**क) नियुक्ती-**

१) निवड यादी मधील व्यक्तींपैकी ज्यांची सेवा उपलब्ध करून घ्यावयाची आहे, त्यांना विद्यापीठात रूजू होण्याकरिता नियुक्तीपत्र देण्यात यावे. सदर व्यक्ती विद्यापीठात रूजू होतांना त्यांचेकडून विहित बंधपत्र/हमी प्राप्त करून मागणीनुसार त्यांना संबंधित विभागात पाठविण्यात यावे.

२) वर्ग ३ व ४ च्या कामाकरिता सेवा उपलब्ध करून घेण्यात आलेली व्यक्ती तिची कामगिरी,चारित्र्य, वर्तणूक इ.च्या अधीन राहून वयाच्या ६५ वर्षापर्यंतच विद्यापीठ सेवेत कार्यरत राहू शकेल. तथापि, ज्या व्यक्तींच्या सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा कुलसचिवांच्या मान्यतेने बंधपत्र/हमीपत्र व वरील अटींच्या अधीन राहून पुढे चालू ठेवता येतील. मात्र, कोणत्याही परिस्थितीत सदर व्यक्ती वयाच्या ७० वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

३) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचारी हे कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने सक्षम असावे.

४) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचारी यांच्याविरूद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. तसेच त्यांचे पूर्वीच्या सेवेतील चारित्र्य व वर्तणूक चांगले असावे. या संदर्भात विद्यापीठ आस्थापना व्यतिरिक्त इतर आस्थापनेतील आवेदनकर्त्याने विहित अर्जासोबत पूर्वीच्या नियोक्त्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्यासंदर्भात आस्थापना शाखेने विहित अर्जामध्ये कार्यालयाचे अभिप्राय नोंदवावे.

५) निवड समितीचे माध्यमातून तयार करण्यात आलेल्या निवड यादीमधील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना साधारणतः निवडसूचीच्या क्रमानुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील. नियुक्ती आदेश दिल्यानंतर संबंधित सेवानिवृत्त कर्मचारी विहित मुदतीत रूजू न झाल्यास यादीतील पुढील कर्मचाऱ्याचा नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल. निवड यादी संपुष्टात आल्यानंतर अतिरिक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची मागणी संबंधित विभाग प्रमुखांकडून झाल्यास कामाची तातडी, आकस्मिकता इ.बाबीचा विचार करून इच्छूक सेवानिवृत्त कर्मचाऱ्याचा विहित अर्ज आवश्यक पुर्ततेसह विभाग प्रमुखांकडून आस्थापना विभागास प्राप्त झाल्यास त्यावर विचार करून विशिष्ठ कालावधीसाठी विशेष बाब म्हणून मान्यता प्रदान करण्याचा अधिकार कुलसचिवांना असेल.

६) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचारी यांचे कामाचे मुल्यमापन दरवर्षी विहित निवड समितीमार्फत करण्यात येऊन त्यानुसार संबंधित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पुढील सेवा उपलब्ध करून घेण्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल.

**ड) मासिक एकत्रित मानधन-**

१) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचारी यांना खालीलप्रमाणे मासिक एकत्रित मानधन अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | वर्गवारी | | मासिक एकत्रित मानधन (रू.) |
|---|---|---|---|
| १ | विद्यापीठामधून/इतर आस्थापनेतून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी | | |
| | अ) | वर्ग ३ | १५०००/- |
| | ब) | वर्ग ४ | ८५००/- |

उपरोक्त मिळकत यथास्थिती आयकर विवरणपत्रात दर्शविण्याची जबाबदारी संबंधितांची राहील.

२) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचारी यांना विद्यापीठाच्या शैक्षणिक/प्रशासकिय विभागांना यथास्थिती लागू असलेल्या कार्यालयीन सुट्या लागू राहतील व या शिवाय त्यांना इतर कुठल्याही रजा अनुज्ञेय राहणार नाही.

३) संबंधित सेवानिवृत्त कर्मचारी कार्यालयीन सुटींव्यतिरिक्त कुठल्याही कारणास्तव कार्यालयात अनुपस्थित राहिल्यास त्या दिवसाचे मानधन दरमहा एकत्रित मानधनाच्या प्रतीदिन अनुपातात कपात केल्या जाईल.

४) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचारी यांना अनुज्ञेय होणाऱ्या एकत्रित मानधनाचा कोणताही परिणाम त्यांना प्राप्त होणाऱ्या निवृत्ती वेतन व महागाई भत्ता यावर होणार नाही.

५) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचारी यांचे पारिश्रमिकापोटी होणारा खर्च हा विद्यापीठीय अर्थसंकल्पीय शीर्ष- "Office Expenses-Payment for Retired persons & Land affected persons or his/her heir" या शीर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

६) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचारी हे ज्या विभागात कार्यरत असतील त्या विभागात त्यांचेकरिता ठेवण्यात आलेल्या स्वतंत्र हजेरी पुस्तकात दैनंदिन उपस्थितीदर्शक स्वाक्षरी करतील. त्यांचे उपस्थितीनुसार संबंधित नियंत्रण अधिकारी महिना अखेर त्यांचे मानधनाचे देयक वित्त विभागास शोधनार्थ पाठवतील.

७) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना देय मानधनाच्या रकमेची प्रतिपूर्ती शासनाकडून होण्याकरिता वित्त विभागामार्फत शासनास प्रस्ताव सादर करण्यात यावेत व त्याचा पाठपुरावा करावा.

इ) **इतर अटी व शर्ती-**

१) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचारी यांना विद्यापीठाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे /सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

२) कुलसचिवांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. या संदर्भात संबंधित सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सेवेसंदर्भात कुठलाही उजर राहणार नाही.

३) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचारी हे सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेले नसावे.

४) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या कार्यालयीन कामाच्या वेळा ह्या सदर संवर्गाच्या नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे तसेच संबंधितांच्या नियंत्रण अधिकाऱ्यांनी वेळोवेळी निर्देशित केल्याप्रमाणे राहतील. तसेच त्यांना सोपविलेली कामे व कामाचे स्वरूप हे संबंधित नियंत्रण अधिकाऱ्याने वेळोवेळी निर्देशित केल्याप्रमाणे राहील. तसेच सोपविलेली कामे पूर्ण निष्ठेने व कार्यालयीन नियमानुसार पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची राहील. तद्वतच नियंत्रण अधिकारी यांनी विभागातील कामाची निकड लक्षात घेऊन कार्यालयीन सुटीचे दिवशी कार्यालयीन कामाकरिता बोलविल्यास कार्यालयास उपस्थित रहावे लागेल. त्याकरिता वेगळे मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

५) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामकाजाचे अनुषंगाने त्यांना प्राप्त होणारी व निदर्शनास येणारी कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील. व ते सदरील माहिती कुणालाही अनधिकृतरित्या पुरविणार नाही.

६) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत कुलसचिव वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

७) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांकडून काम करवून घेण्याची तसेच त्यांनी सादर केलेले / केलेले काम याच्या पर्यवेक्षणाची संपूर्ण जबाबदारी संबंधित विभागातील अधीक्षक/यथास्थिती नियंत्रण अधिकाऱ्यांची राहील.

८) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना विद्यापीठाच्या कोणत्याही शैक्षणिक / प्रशासकीय विभागामध्ये वेळोवेळी आवश्यकतेनुसार काम करावे लागेल.

९) वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवा उपलब्ध करून घ्यावयाचे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना नियुक्ती दिल्यानंतर त्यांना विद्यापीठातील नियमित कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या इतर सोयी व सवलती लागू असणार नाहीत.

परिशिष्ट-ब

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

अलिकडे काढलेले पासपोर्ट आकाराचे छायाचित्र येथे चिटकवावे

**सेवानिवृत्त कर्मचारी यांनी विद्यापीठामध्ये मासिक एकत्रित मानधनावर वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गाच्या कामाकरिता करावयाचे आवेदनपत्र**

१) जाहिरात क्र.................................................................. दिनांक ........................

२) आवेदनपत्र सादर करावयाचा संवर्ग - वर्ग ३ / वर्ग ४ (अनावश्यक ते खोडावे)

३) आवेदकाचे संपूर्ण नांव :- ....................................................................................
(आडनांव प्रथम)

४) कायमचा पत्ता :- ..........................................................................................
..........................................................................................
.................................................... पीन कोड ......................

५) पत्रव्यवहाराचा पत्ता :- ..........................................................................................
..........................................................................................
.................................................... पीन कोड ......................

६) भ्रमणध्वनी क्रमांक :- ............................ दूरध्वनी क्रमांक :- ..................................
इ-मेल :- ....................................................

७) जन्मतारीख :- ................................................

८) आवेदनपत्र सादर करण्याचे तारखेस असलेले वय :- वर्ष ......... महिने ......... दिवस.......

९) आवेदकाची जात व प्रवर्ग :- .........................................................

१०) सेवानिवृत्तीचा दिनांक :- ...........................................................................

११) सेवानिवृत्तीचे दिवशी धारण केलेले पद व पदाचा गट :- ................................................

१२) ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले/होणार :- ............................................................
त्या कार्यालयाचे नाव व पत्ता ............................................................

१३) शैक्षणिक अर्हता - (शालांत परीक्षेनुसार क्रमाने)

| अ. क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | विद्यापीठ/मंडळ | प्राप्त श्रेणी | प्राप्त गुणांची टक्केवारी | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |

१४) संगणक विषयक अर्हता :-

| अ. क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | विद्यापीठ/मंडळ | प्राप्त श्रेणी | प्राप्त गुणांची टक्केवारी | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |

१५) अनुभवाचा तपशिल :- (सेवेत रूजू झाल्यापासून कालानुक्रमे उल्लेखित करावा.)

| धारण केलेले पद व विभागाचे / कार्यालयाची नांवे व पत्ता | पासून | पर्यत | कालावधी | | पे बँड व ग्रेड पे | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिने | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

टिप :- विद्यापीठ आस्थापना व्यतिरिक्त इतर आस्थापनेतील आवेदनकर्त्याने सदर अर्जासोबत त्यांच्या नियोक्त्याचे, १) सेवानिवृत्तीचा दिनांक, २) सेवानिवृत्तीचे वेळी धारण केलेले पद, ३) सेवाकाळात पार पाडलेल्या कामाचे स्वरूप, ४) कुठलीही जबर शिक्षा ठोठावली नसल्याचे, ५) त्यांचेविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसल्याचे तसेच ६) सेवेतील चारित्र्य व वर्तणूक चांगली असल्याचे प्रमाण सादर करणे आवश्यक आहे.

१६) इतर उपक्रम :- ........................................................................................................

........................................................................................................

१७) काही अधिक माहिती द्यावयाची झाल्यास ती येथे नमूद करावी :-.......................................

........................................................................................................................

## प्रतिज्ञापत्र

माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे मी या अर्जात नमूद केलेली माहिती खरी असून माहिती खोटी ठरल्यास आवश्यक त्या कार्यवाहीस मी पात्र राहील.

ठिकाण :-

दिनांक :- (आवेदकाची सही)

---

## आस्थापना शाखेचा शेरा
## (विद्यापीठातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांकरिता)

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कु............................................................ हे/ह्या कार्यालयीन अभिलेखानुसार, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सेवेतून दि...................... रोजी .................... या पदावरून सेवानिवृत्त झाले/झाल्या आहेत. त्यांनी त्यांच्या सेवाकाळात .............................. या संवर्गातील कामे पार पाडलेली आहेत. त्यांचे सेवाकालावधीत त्यांचेवर जबर शिक्षा ठोठावलेली नाही/आहे. तसेच त्यांचेविरूद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कार्यवाही चालू किंवा प्रस्तावित नाही/आहे. तसेच त्याचे विद्यापीठ सेवा कालावधीतील चारित्र्य व वर्तणूक चांगले होते/नव्हते.

दिनांक :- उपकुलसचिव (आस्था.)

ठिकाण :- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ